# नाशिक जिल्हयातील घरपोच धान्य योजना

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील एक यशस्वी प्रयोग

भारतात सर्वप्रथम नाशिक जिल्हयात प्रायोगिक तत्वावर सुरु केलेल्या घरपोच धान्य योजनेला नुकताच महाराष्ट्र शासनाचा ‘राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार २००८’ प्राप्त झाला आहे. माहे मार्च २०१० अखेर नाशिक जिल्ह्यातील ३१४ गावांमध्ये लोकांच्या पुढाकाराने ही योजना राबविली जात आहे. तसेच नंदूरबार जिल्ह्यातील दुर्गम भागातदेखील ही योजना यशस्वी झाली आहे. एवढया मोठ्या संख्येने योजनेचे स्वागत लोकांनी केल्यामुळे प्रत्यक्ष योजनेची अंमलबजावणी करताना आता या योजनेमध्ये फारशा प्रशासकीय अडचणी राहिलेल्या नाहीत. इतर जिल्ह्यांमध्येदेखील ही योजना यशस्वी होऊ शकते हे स्पष्ट झाले आहे.

### १. योजनेचा शुभारंभ

शासनाने योजनेच्या अंमलबजावणीसाठी तत्वतः मान्यता दिल्यानंतर दिनांक ६ जुन २००७ रोजी मौजे अलंगुण ता. सुरगाणा येथे मा.जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उपायुक्त (पुरवठा), स्थानिक आमदार श्री.जे.पी.गावीत, जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच परिसरातील सुमारे ५० गावांमधील ग्रामस्थ लोक आणि लाभार्थी यांचे उपस्थितीत योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

पहिल्याच दिवशी या योजनेस गावक-यांनी अतिशय चांगला प्रतिसाद दिला.एवढेच नव्हे तर संपुर्ण आदिवासी असलेल्या या भागात पहिल्यांदाच एवढे धान्य मिळु शकते याबाबत अत्यंत आनंद व्यक्त केला गेला. सर्व वृत्तपत्रांनी याची नोंद घेतली. या योजनेबाबत योजनेच्या सुरुवातीलाच खालील उत्स्फुर्त प्रतिक्रिया मान्यवरांनी व्यक्त केल्या :

- **मा. जिल्हाधिकारी श्री.चोक्कलिंगम** - सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणता यावी व थेट लाभधारकांना पुरवठा व्हावा या उद्देशाने सुरु होत असलेली ही योजना निश्चितच पथदर्शी ठरु शकेल. अनेक वेळा योजना कोणासाठी आहे यापेक्षा कोण राबवित आहे यास अकारण महत्व दिले जाते.
- **मा.आमदार श्री.जे.पी.गावीत** - घरपोच धान्य वितरण योजना संपुर्ण देशभरात आदर्शवत ठरणार आहे. प्रशासन व ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे अलंगुण गावच्या या योजनेची इतिहासात नोंद झाल्याशिवाय राहणार नाही. या योजनेच्या पहिल्याच दिवशी आदिवासी कुटुंबांनी धान्य घेण्यासाठी रांगा लावुन उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदविला. महिला व मुलींनी डोक्यावर स्वतः ५० किलोचे पोते उंच डोंगरावर पोहोचविले.

## २. योजनेचे स्वरुप

गेली ५० वर्ष, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये रेशनचे धान्य हे दर महिन्याला रेशनकार्ड घेऊन गेल्यानंतर स्वस्त धान्य दुकानदाराकडुन ग्राहकाला मिळते.

या योजनेमध्ये मुलताः बदल करुन एकाच वेळी ३ महिने, ६ महिने किंवा १२ महिन्यांचे पैसे जर लोकांनी अगोदर भरले तर धान्याचे पोते जसेच्या तसे थेट लोकांच्या हातात देता येईल असा विचार करुन ही योजना सुचविण्यात आली होती. अपर जिल्हाधिकारी म्हणुन काम करतांना वारंवार येणा-या धान्याविषयीच्या तक्रारींवर कशी मात करता येईल याचा अभ्यास करतांना श्री. शेखर गायकवाड, अप्पर जिल्हाधिकारी नाशिक यांनी स्वतः आदिवासी पाडयांवर लोकांबरोबर प्रथम थेट चर्चा केली. पुन्हा पुन्हा स्वस्त धान्य दुकानदांराकडे मारावे लागणारे हेलपाटे, होणारा मनस्ताप, त्यानंतर प्रशासनाकडे केले जाणारे चौकशीचे अर्ज, त्यानंतर मागावुन होणारी चौकशी व अपवादात्मक परिस्थितीत होणारी कारवाई व केलेल्या कारवाईवर सुध्दा जनतेचा विश्वास नसल्याची बाब विचारात घेता प्रचलित व्यवस्थेपेक्षा थोडा वेगळा विचार करुन कार्डधारकांचे नावावरील संपुर्ण धान्य एकाच वेळी त्यांचे हातात देता येईल काय, व त्यामुळे या सर्व प्रश्नांवर मात करता येईल काय या भुमिकेतुन घरपोच धान्य योजनेचा उगम झाला!

सर्वप्रथम प्रायोगिक तत्वावर दिंडोरी व सुरगाणा या दोन आदिवासी तालुक्यांमध्ये व निफाड या बिगर आदिवासी तालुक्यात ही योजना राबविण्याचा मानस होता. तरीसुध्दा स्वतःहून नाशिक जिल्हयातील सर्व तालुक्यांमधील काही गावांनी स्वयंस्फुर्तीने या योजनेमध्ये सहभाग नोंदविला. या योजनेचे स्वरुप मुख्यतः खालीलप्रमाणे आहे :

१) ज्यांचेसाठी रेशनिंग व्यवस्था आहे त्या गावातील सर्व रेशन कार्डधारकांनी पुढच्या ३/६/१२ महिन्यांच्या धान्याची रक्कम स्वतःकडे तयार ठेवावी.

२) स्वस्तधान्य दुकानाच्या एकुण लाभार्थ्यांपैकी सर्वसाधारणपणे ६० टक्केपेक्षा जास्त लोकांनी अशी रक्कम एकदम भरण्याचे ठरविल्यास एकाच दिवशी चलनाने स्वस्त धान्य दुकानदारामार्फत किंवा पुरवठा अधिका-यामार्फत संपुर्ण गावाची रक्कम चलनाने तहसिल कार्यालयात भरणे.

३) रक्कम भरल्यानंतर ताबडतोब २/३ दिवसांचे आत गावक-यांच्या सोईप्रमाणे शासकीय गोदामातुन तेवढे धान्य दुकानदारामार्फत किंवा शासकीय वाहनाने गावापर्यंत पोहोचविणे.

४) गोदामातुन नेण्यात आलेले धान्य हे स्वस्त धान्य दुकानदाराच्या दुकानात न नेता ग्रामपंचायतीसमोर किंवा गावातील महत्वाच्या सार्वजनिक ठिकाणी ठेवणे.

५) पुढील एक तासात ५० किलोंच्या पोत्यांच्या स्वरुपात संबंधीत कुटुंबाला धान्य वाटप करणे व त्यांच्या सहया घेणे. धान्य हे पुर्ण पोत्याच्या स्वरुपात देणे हे देखील या योजनेचे वैशिष्टय आहे.

६) धान्य वाटप झाल्यावर ३/६ किंवा १२ महिन्यांचे धान्याचे कमिशन गावासमोर स्वस्त धान्य दुकानदाराला देणे.

## ३. धान्याची भरावयाची रक्कम

या योजने अंतर्गत प्रत्यक्ष लाभार्थ्याला दर तीन महिन्यांसाठी व सहा महिन्यांसाठी किती रक्कम भरावी लागेल हे खाली दर्शविले आहे :

| अ. क्र. | योजना | ३ महिन्यांसाठी मिळु शकणारे जास्तीत जास्त धान्य (किलो) | | भरावी लागणारी रक्कम (रुपये) | ६ महिन्यांसाठी मिळु शकणारे जास्तीत जास्त धान्य (किलो) | | भरावी लागणारी रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | गहु | तांदुळ | | गहु | तांदुळ | |
| १ | अन्नपुर्णा | १५ | १५ | मोफत | ३० | ३० | मोफत |
| २ | अंत्योदय | ५० | ५० | २५० रु. | १०० | १०० | ५०० रु. |
| ३ | बीपीएल | ५० | ५० | ५५० रु. | १०० | १०० | ११०० रु. |
| ४ | एपीएल | ५० | ५० | ८२५ रु. | १०० | १०० | १६५० रु. |

## ४. योजनेची महत्त्वाची तत्वे

१) अन्नधान्य महामंडळाकडून धान्य खरेदी करण्याची प्रचलित पध्दत कायम राहते.

२) अन्नधान्य महामंडळ ते तालुका गोदामाच्या अंतरातील वाहतुक व्यवस्था व खर्च कायम राहतो.

३) तालुका गोदामापासुन धान्य हे दुकानात न नेता शासनाने ठरविलेल्या कार्यक्रमाप्रमाणे थेट गावात नेण्यात येते.

४) ग्राहकांकडुन अगोदर पुर्ण रक्कम भरुन घेऊन ग्राहकांपर्यंत धान्य वाटप करतांना वाडी, वस्ती व गावच्या गावठाणातील मध्यवर्ती ठिकाणी आगाऊ प्रसिध्द केलेल्या वेळी जाहीररीत्या धान्याचे वाटप करण्यात येते.

५) धान्य हे प्रत्येकी ५० किलोच्या पोत्याच्या स्वरुपात दिले जात असल्यामुळे फार कमी वेळात धान्याचे वितरण होते. धान्य वितरण हे पत्रकार, स्वयंसेवी संस्था, लोक प्रतिनिधी व ग्रामस्थ यांच्यासमोर करण्यात येते.

६) असे धान्य वितरण झाल्यानंतर कोणत्याही सरकारी यंत्रणेला, स्वयंसेवी संस्थांना याची तपासणी करता येते.

७) आदिवासी, शेतकरी यांना त्यांच्या शेतातुन मिळणा-या धान्याचा हंगाम लक्षात घेवून व शेतमजुरांच्या स्थलांतराचा कालावधी विचारात घेऊन जेव्हा धान्याची जास्तीत जास्त गरज असते, तेव्हाच धान्य वितरणाचा दिनांक व वेळ ठरविता येतो.

## ५. अंमलबजावणीनंतर योजनेचे निदर्शनास आलेले फायदे

### १) एकदाच धान्य वाटप

तिन / सहा महिन्यातुन फक्त एकदाच व त्या त्या वाडी वस्तीतील प्रत्येक रेशनकार्डधारकास एकाच दिवशी धान्य मिळणार असल्यामुळे पुढील तिन / सहा महिने त्यांच्यापर्यत धान्य पोहचविण्याची गरज राहत नाही.

### २) धान्याची सुरक्षितता

सहा महिन्याचे धान्य घरात एकदमच आल्यामुळे धान्याची सुरक्षितता निर्माण होते. शेकडो वर्षे शेतकरी कणगी व पेव या मध्ये वर्षाचे धान्य घरी साठवत आला आहे. आता साठवणुकीची साधणे वाढल्यामुळे तिन/सहा महिन्याचे धान्य त्याला नक्कीच साठविता येते.

जगभर गरीबांसाठी धान्याची सुरक्षितता हा मोठा प्रश्न असतांना व एकीकडे गोदामांमध्ये प्रचंड धान्य असतांना विकेंद्रीत स्वरुपात प्रत्येक गरजुंच्या घरी धान्य असल्यामुळे पुढील तिन / सहा महिन्याच्या धान्याची चिंता संपुष्टात येते.

### ३) वाटपातील पारदर्शकता

पल्स पोलीओ योजनेप्रमाणे एकाच दिवशी सार्वजनिक कार्यक्रम करुन व ग्रामसभेसमोर सर्व लोकांना धान्य दिले जात असल्यामुळे धान्य पोहचविण्यातील गैरव्यवहार पुर्णपणे टाळणे शक्य झाले आहे.

### ४) संनियंत्रण :-

एकदा धान्य दिल्यानंतर पुढील ३ / ६ महिने कोणत्याही यंत्रणेमार्फत धान्य प्रत्यक्षात मिळाले किंवा नाही याची तपासणी करता येऊ शकते. धान्याच्या पुरवठयातील शासकीय यंत्रणांवर होणारे आरोप आता या योजनेमुळे बंद झाले आहेत. धान्य वाटपावर या योजनेमुळे १०० टक्के नियंत्रण आले आहे.

### ५) शास्वत योजना :-

प्रचलीत व्यवस्थेतील धान्य वितरणाचा खर्च कमी करुन व धान्य पाहोचवण्याची हमी वाढवण्याची ही शाश्वत योजना आहे. सध्या वर्षातील प्रत्येक महिन्यामध्ये ग्राहकाला दुकानदारापर्यंत हेलपाटे मारावे लागतात. तसेच दुकानदाराला सुध्दा प्रत्येक महिन्याला धान्य दुकानापर्यंत न्यावे लागते. तिन/सहा महिन्याचे एकत्रित धान्य नेल्यामुळे वाहतुक खर्च कमी झाला आहे.

### ६) खर्चात बचत

सुधारीत योजनेमुळे धान्याची गोदामापासुन होणारी तिन महिन्यात तिन वेळा होणारी वाहतुक होत नाही. त्याएवेजी एकदाच वाहतुक होते. त्यामुळे एकूण खर्चामध्ये मोठया प्रमाणावर कपात होत आहे.

**७) कुटूंबियांचे धान्यावर लक्ष**

गरजु व्यक्ती देखील या संपूर्ण योजनेत व कार्यक्रमात सहभागी होत असल्यामुळे व सर्वांसमक्ष धान्य घरात आणल्यामुळे योजना कुटुंबाभिमुख झाली आहे. व विशेषतः गृहिणींची चिंता मिटली आहे. दारुसारख्या व्यसनांमुळे होणारी काही कुटुंबाची वाताहात विचारात घेता पुढच्या तिन / सहा महिन्याची धान्याची भ्रांत मिटू शकेल व तसा दिलासा कुटूंबातील स्त्रीला मिळेल अशी खात्री या योजनेमध्ये समाविष्ट आहे. इगतपुरी तालुक्यातील अतिशय दुर्गम अशा अंबेवाडी गावामध्ये त्यामुळेच गावातील लोकांनी बैलगाडीतुन अधिका-यांची मिरवणुक काढली. पावसाळयामुळे प्रचंड प्रमाणावर धो-धो पाऊस पडणा-या या भागातील लोकांनी आपली खालीलप्रमाणे उत्स्फुर्त प्रतिक्रिया दिली.

*“आमच्या गावात आता पुढचे चार महिने पावसाळयामुळे कोणीही येणार नाही. रस्ते खराब असल्यामुळे मालाची ने-आण करता येत नाही. अशा वेळी आमची सगळयांची घरे धान्याने भरुन टाकल्यामुळे कित्येक पिढयांमध्ये न झालेली गोष्ट आम्हाला बघावयास मिळाली आहे.”*

**८) गरीबांना वरदान व कुपोषणावर मात**

कुपोषणाच्या विरोधात लढतांना, शासन ज्याप्रमाणात अन्न धान्यावर पैसा खर्च करते त्या तुलनेने धान्य गरीब लोकांपर्यत पोहोचविण्यावरील खर्च जास्त आहे. गरीब व आदिवासी लोकांना जगण्यात असलेली सर्वात मोठी भ्रांत म्हणजे अन्नधान्य होय. धान्याची सुरक्षितता आल्यामुळे व प्रत्यक्ष घरात अगोदरच धान्य असल्याने निदान आपली मुले - बाळे उपाशी राहणार नाहीत अशी कुटूंबियांची खात्री या योजनेतुन निर्माण झाली आहे. जगण्याची भ्रांत कमी झाल्यामुळे त्यांना रोजगारावर लक्ष केंद्रीत करता येईल. आदिवासी भागातील कुपोषण संपुष्टात आणण्याचे कित्येक वर्षे प्रयत्न चालु असतांना देखील त्यात अद्याप १००% यश मिळालेले नाही. या योजनेमुळे कुपोषणावरदेखील मात करता येईल.

**९) प्रत्यक्ष राहणा-यास धान्य**

प्रत्यक्ष गावात न राहाणा-या व्यक्ती सुध्दा शैक्षणिक, धार्मिक किंवा अन्य कारणांसाठी अनेक वेळा दोन ठिकाणी रेशन कार्डवर नांव ठेवतात. आगाऊ पैसे भरुन प्रत्यक्ष राहणा-या व्यक्तीला धान्य मिळणार असल्याने बोगस रेशनकार्डांवर धान्य देण्यासारखा काळाबाजार टाळणारी ही योजना आहे.

**१०) संघटीत काळया बाजारास आडकाठी**

काळा बाजार करणा-या अनेक दुकानदार, व्यापारी व मध्यस्थ यांच्या विरोधात जीवनावश्यक वस्तु कायद्याखाली दरवर्षी गुन्हे दाखल केले जातात. गावाच्यासमोर व एकदाच धान्य वाटप केल्यामुळे धान्याच्या अपहाराबद्दल संघटितरित्या वाहतुकीच्या दरम्यान काळाबाजर व गैरव्यवहार करण्यास आडकाठी आली आहे.

**११) क्रयशक्तीत वाढ**

गरीब लोकांची क्रयशक्ती वाढण्यास या योजनेमुळे मोलाची मदत झाली आहे.

**१२) ग्राहकांना समाधान व वेळेत बचत**

केवळ रेशनचे धान्य मिळावे म्हणून ग्राहकांचे दुकानदाराकडे होणारे असंख्य खेटे या व्यवस्थेत बंद झाले आहेत. एकदाच खर्च योजनांचे धान्य वाटप होत असल्याने रेशनकार्डधारकांचे चौकशीसाठी व धान्यासाठी हेलपाटे होत नाही. त्यामुळे ग्राहकांना समाधान मिळेल व वेळेत बचत होईल.

**१३) गरजुंच्या घरात धान्य**

शासकीय धान्य मुख्यतः गोदामात पडून न राहता गरज असलेल्या लाखो व्यक्तींच्या घरांमध्ये विकेंद्रीत स्वरुपातील छोटया साठयाच्या स्वरुपात राहिले तर जगात कोणत्याही देशात नसेल एवढी अन्नसुरक्षा निर्माण करता येईल.

**१४) प्रशासनाचा वेळ व पैशात बचत**

घरपोच धान्य योजनेमुळे प्रशासकीय कामकाज, स्वस्त धान्य दुकानदारांचे चलन, परमीट, रिबेटची बीले, इत्यादी कामे करण्यातील तहसिल कार्यालयातील वेळेत बचत झाली आहे. उपलब्ध शासकीय संसाधनांचा वापर अधिक चांगल्या पध्दतीने करणे आता शक्य झाले आहे. तिन किंवा सहा महिन्यांसाठी एकदाच ही सर्व कागदपत्रे तयार होत आहेत, त्यामुळे प्रशासकीय वेळ व खर्च कमी होत आहे.

**१५) प्रशासनाचे वाटपावर लक्ष**

उपलब्ध शासन यंत्रणा ही १०० टक्के या योजनेच्या अमलबजावणी करता वापरता येते. नंतर तपासणीसारख्या कामात अडकण्यापेक्षा थेट धान्य लोकांना देण्याकडे लक्ष केंद्रीत करता येणे शक्य झाले आहे.

**१६) पहिल्यांदाच गरीब श्रीमंत समोरासमोर**

घरपोच धान्य वाटप योजनेमुळे एक नवीनच पैलु गावाच्या समोर आला आहे. अनेक श्रीमंतांनी गावातील सत्तेच्या जोरावर घेतलेली पिवळी रेशनकार्डे स्वतःच्या नावावर केली आहेत व सर्व व्यक्ती समोरासमोर पैसे भरत असल्यामुळे व धान्य घेत असल्याने गावाच्या समोर खरे चित्र आले आहे. त्यामुळे गावाच्या समोर उघडपणे या यादीबाबत उलटसुलट चर्चा होत आहे. गरीबांतच पिवळेकार्डे असली पाहिजेत ही भावना गावांत वाढीस लागत आहे व त्यामुळे धनदांडग्या लोकांसमोर गरीबांचा दबाव वाढण्यासारखा एक सामाजिक फायदा निदर्शनास आला आहे.

**१७) धान्याचे रिकामे पोते**

यापुर्वी धान्याची रिकामी पोती रास्तभाव धान्य दुकानदारास मिळत होती. परंतु आता संबंधीत कुटुंबास हे रिकामे पोते (अंदाजे किंमत १० ते १२ रुपये) मिळत आहे. आदिवासी व गरीब कुटुंबाला एकदम २ किंवा ४ पोती धान्य मिळत असल्याने रिकाम्या पोत्यांचा देखील त्यास अतिरिक्त फायदा होत आहे. पावसाळी भागात आदिवासी कुटुंबाला रिकामा बारदाना अनेक कामासाठी वापरता येतो.

## ६) योजनेची प्रगती (माहे मार्च २०१० अखेर)

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | घरपोच योजनेत सहभागी गाव / दुकानांची संख्या | सहभागी कार्डधारक | तीन महिन्यांसाठी वाटप केलेले धान्य (क्विं) |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ९ | ८२० | ८२० |
| २ | इगतपूरी | ३८ | १०३९६ | १०३९६ |
| ३ | सिन्नर | ८ | ८६१ | ८६१ |
| ४ | दिंडोरी | २४ | ३१७३ | ३१७३ |
| ५ | पेठ | ४१ | ३३९९ | ३३९९ |
| ६ | सुरगाणा | ५० | ४५७८ | २००५ |
| ७ | निफाड | ४ | १९१० | १९१० |
| ८ | त्र्यंबकेश्वर | ३६ | ३७१० | ३७१० |
| ९ | नांदगाव | ३ | २१४ | २१४ |
| १० | सटाणा | २० | २३८० | २३८० |
| ११ | चांदवड | २३ | २३९६ | २९७० |
| १२ | कळवण | ४६ | ३२७२ | ३२७२ |
| १३ | देवळा | २ | १६६ | १६६ |
| १४ | येवला | १ | ४३७ | ३३९ |
| १५ | मालेगाव | ९ | १४४९ | १४४९ |
| | **एकुण** | **३१४** | **३९१६१** | **३७०६४** |

## ७) अतिरिक्त धान्याची आवश्यकता नाही

घरपोच धान्य योजनेमध्ये वाटपासाठी अतिरिक्त धान्याची आवश्यकता नाही. ही योजना राबवितांना एकदम ३ किंवा ६ महिन्याचे धान्य दिले जात असल्यामुळे, अशी योजना संपुर्ण राज्यभर लागु केल्यास प्रत्येक जिल्हा व तालुक्यासाठी प्रचंड मोठया प्रमाणावर धान्य लागेल असा समज होण्याची दाट शक्यता आहे. परंतु प्रत्यक्षात ही योजना राबवितांना नाशिक जिल्हयात आतापर्यंत ३१४ गावे या योजनेखाली येऊनसुध्दा कोणत्याही तालुक्याला जास्त धान्य द्यावे लागलेले नाही. सर्वसाधारणपणे प्रत्येक तालुक्यात महिना संपण्याच्या वेळी सर्व स्वस्तधान्य दुकानदारांना देऊनसुध्दा किमान काही धान्यसाठा शिल्लक असतो. किंबहुना एक महिन्याचे धान्य अगोदर साठवुन ठेवले पाहिजे अशी शासनाची अपेक्षा आहे. प्रत्यक्षात ३००-४०० क्विंटल जरी धान्य एखाद्या तालुक्याच्या गोडावुनमध्ये महिन्याच्या सुरुवातीला शिल्लक असले तरी घरपोच धान्य योजना राबविता येते ही दर्शविणारा तक्ता मागे आहे.

(आकडे क्विंटलमध्ये)

| अ. क्र. | महिन्याच्या सुरुवातीची शिल्लक | त्या महिन्याला प्राप्त धान्य | एकुण | स्वस्त धान्य दुकाने | मासिक धान्याची गरज | वाटप | शिल्लक धान्य | घरपोच योजना | | वाटप करुन शिल्लक धान्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | गावे | लागणारे धान्य (तीन महिन्यासाठी) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | ० | ३२०० | ३२०० | ११५ | २९०० | २९०० | ३०० | १ | ९० | २१० |
| २ | २१० | ३२०० | ३४१० | ↓११४ | २८७० | २८७० | ५४० | २ | २८५ | २५५ |
| ३ | २५५ | ३२०० | ३४५५ | ↓११२ | २७७५ | २७७५ | ६८० | ४ | ६२० | ६० |
| ४ | ६० | ३२०० | ३२६० | ↓१०८ | २५६८ | २५६८ | ६९२ | ५+१ | ६००+९० | २ |

* रकाना ९ मधील गावे वाढत जाऊन रकाना ५ मधील दुकानांची संख्या कमी होत जाते.
* त्याचप्रमाणे रकाना ६ व ७ पाहता घरपोच धान्य योजनेची गावे जसजशी वाढत जातील तसे धान्याच्या नियमित दुकानदारांना वाटप कमी होत जाते व लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळतो.
* यावरुन फक्त २०० किंवा ३०० क्विंटल धान्य शिल्लक असेल तर अशा तालुक्यात योजना राबविली जाऊ शकते.